भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०१/२०१७

**१) संगनमत करुन बांधकामासाठी वर्गणी मागण्याचे कारणावरुन काठीने मारहान करुन गंभिर दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०१/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील फिर्यादीस चारही आरोपीतांनी संगणमत करुन बौध्द विहाराचे बांधकामासाठी पैसे वर्गणी मागण्याचे कारणावरुन भांडण करुन काठयांनी तोंडावर,पाठीवर व हातावर मारुन गंभिर दुखापत करुन ३ दात पाडल्याने फिर्यादी विनोद धरमदास शेंडे वय ३२ वर्ष, रा. गणेशपुर भंडारा यांचे व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गोपाले पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे, एक जखमी . :–**

दिनांक १५/०१/२०१७ चे १७.४५ वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल लापरवाहीने हयगयीने व निष्काळजीपने चालवुल फिर्यादीचे मोटार सायकल क्र. एमएच ४० बीए २०१९ ला समोरुन मचेरा बस स्टॉप येथे धडक मारुन फिर्यादीस जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी हितेश रवींद्र देवगडे वय २१ वर्ष, रा. लोधी नगर तीरोडा जि. गोंदीया यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल चालकांच्या लापरवहीने तीन जखमी . :–**

दिनांक १५/०१/२०१७ चे १५.१५ वा. दर. यातील फिर्यादी पांडुरंग महादेव खोब्रागडे वय ५५ वर्ष, रा. सिल्ली आंबाडी हा आपल्या स्पलेन्डर प्लस मोटार सायकल क्र. एमएच ३६ सी २०३२ ने दुर्गाबाई चे डोहा वरुन साकोली कडे येत असता व यातील आरोपी मोटार सायकल चा चालक हा डोहाकडे जत्रेवर जात असतांना आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने लापरवाहीने व हयगयीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक मारुन फिर्यादीस व त्याची पत्नी सौ. सविता वय ४५ वर्ष, मुलगी पुजा वय १४ वर्ष, यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमी हे उप जिल्हा रुग्णालय साकोली येथे उपचार घेत असुन त्यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) अवैध दारू अडयांवर धाडी . :–**

दिनांक १५/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. करडी, आंधळगाव व साकोली येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २७ लिटर हातभट्टी दारु + ३६०किलो सडवा कि. ८,८५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.